Rotary club of Latur Mid-Town

THE MAGIC OF ROTARY

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MIDTOWN

Rotary International District 3132 | Club No. 22604

## OCTOBER-2024



**Stephanie A. Urchick**
Rotary International President



**Rtn Suresh Saboo**
District Governor



**Rtn Chetan Pandharikar**
President



**Rtn Girish Pensalwar**
Secretary

# TABLE OF CONTENTS


- दान आणि दातृत्व - Rtn CA Virendra Deshpande 3
- Rotary Foundation Information 4
- क्लब एडमिनिस्ट्रेशन: क्लब की जान - PP Rtn Litesh Shah 5
- आरोग्य तपासणी शिबिर 7
- प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण 8
- दिवाळी पाककृती कार्यशाळा! 9
- नवरात्र महोत्सव 2024 10
- रोटरी अन्नपूर्णा योजना 11
- Latur Build Expo 2025 12
- “Proud MIDTOWN Parivaar” 13
- Meetings October 16
- November Birthdays 17
- November Anniversaries 18


**Editor - Rtn Prasad Warad**

"As we present this month's bulletin, the Rotary Club of Latur Midtown reaffirms its dedication to sharing inspiring stories of service, fellowship, and growth. Let this platform reflect our ongoing efforts and future aspirations to make a lasting impact."

# दान आणि दातृत्व

**"No one has become poor from giving".**
**ANNE FRANK.**



**रो. सीए. विरेंद्र वि. देशपांडे**
जीएमएल संपादक (RY 2024-25)
माजी अध्यक्ष (रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रल)

मानव सभ्यतेत अनेक शतकांच्या सामूहिक अनुभवातून काही जीवनमूल्ये मान्य झालेली आहेत. त्यात परोपकार आहे, क्षमाशीलता आहे, समर्पण आहे, सत्याचा आग्रह आहे, अन्यायाची चाड आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दातृत्व आहे. दातृत्वाचा आणि दानाचा इतिहास पुराणकाळापासून जुना आहे. दधीची ऋषींनी इंद्राला वज्र बनवण्यासाठी आपली हाडे दान केली, महाराज चक्रवर्ती बळी यांनी वामनाला सर्व पृथ्वी दान दिली आणि स्वतः पाताळात गेले,
श्रीविष्णू अवतार परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी जिंकून एकवीस वेळा ती क्षत्रियांना दान केली. एकलव्याने द्रोणाचार्य ऋषींकडून ज्ञान रास्त मार्गाने घेतले नसतानाही गुरुदक्षिणेपोटी उजव्या हाताचा अंगठा त्यांना दान केला. कर्णाचे दातृत्व तर हिंदू सभ्यतेत परमउच्च दर्जाचे समजले जाते.

व्यावहारिक दृष्ट्या बघितले तर दान हे एका प्रकारे गरिबी आणि श्रीमंतीमधली दरी मिटविण्याचे काम करते, असे समजले जाते. ते तसे होत असेलही, पण दातृत्व कृतीचे योग्य असे दर्शन नाही, तर दातृत्व ही सौभाग्यशाली लोकांनी समाजाप्रती स्वतःवर घालून घेतलेली एक जबाबदारी आहे. आपल्याकडे जे गरजेपेक्षा जास्त आहे, ते ज्यांच्याकडे कमी आहे त्यांना देण्याचे व्रत आहे. त्यामध्ये कणव आहे, घृणा नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

तुकाराम महाराजांनी दानाला चांगला विनियोग म्हटले आहे. ते म्हणतात,

"जोडोनिया धन उत्तम वेव्हारे! उदास विचारे वेच करी!
उत्तमची गती तो पावेल! उत्तम भोगील जीव खाणी!!"

जो परिश्रमाने, चांगल्या मार्गाने धन कमवेल, तो धनाचा उपयोग चांगल्या प्रकारे करेल. तरच त्याला योग्य जीवन आणि गती मिळेल. चांगल्या उपयोगात जास्तीचे धन सत्पात्री दान करण्याचा मार्ग उत्तम आहे, असे आपल्या पूर्वजांचे म्हणणे आहे.

आणि श्रीमंत किंवा धनाच्या बाबतीत भाग्यवान असलेल्या लोकांनीच दान करण्याचा ठेका घेतला आहे किंवा त्यांना तो दिलेला आहे, असे नाही. दान अनेक प्रकारे होऊ शकते. ज्ञानदान, अन्नदान, श्रमदान, जलदान, धान्यदान, रक्तदान, अर्थदान, अवयवदान, देहदान—असे कितीतरी प्रकारांनी आपण आपले दातृत्व सिद्ध करू शकतो.
इंग्लंडचे माजी पंतप्रधान चर्चिल यांनी एके ठिकाणी म्हटले आहे:

"We make a living by what we get but
We make a life by what we give".

दोनच गोष्टी दातृत्वाच्या बाबतीत बघितल्या जातात:
ते निरपेक्ष असले पाहिजे; म्हणजे त्या दानाच्या कृतीत आपल्याला त्यातून काही लाभ होईल, अशी अपेक्षा नसावी.
ते सत्पात्री असले पाहिजे; म्हणजे त्याचा उपयोग योग्य व्यक्ती, योग्य समाज, योग्य वेळी आणि योग्य कामासाठी झाला पाहिजे.

भगवान श्रीकृष्ण गीतेत अर्जुनाला सांगतात:
"कर्तव्य म्हणून योग्य व्यक्तीला योग्य स्थळी, वेळी आणि काळी प्रत्युपकाराची अपेक्षा न करता दिलेल्या दानाला सात्विक दान असे म्हटले जाते."


श्रीविष्णू अवतार परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी जिंकून एकवीस वेळा ती क्षत्रियांना दान केली. एकलव्याने द्रोणाचार्य ऋषींकडून ज्ञान रास्त मार्गाने घेतले नसतानाही गुरुदक्षिणेपोटी उजव्या हाताचा अंगठा त्यांना दान केला. कर्णाचे दातृत्व

रोटरीच्या माध्यमातून अथवा रोटरी फाउंडेशनच्या माध्यमातून जर हे दान केले गेले, तर ते योग्य वेळी, योग्य व्यक्ती किंवा समाजासाठी, आणि योग्य कामासाठीच वापरले जाते. त्यामुळे ते आपल्यासाठी सात्विक दान ठरते. कारण रोटरीला त्यातून प्रत्युपकार नको असतो. ते अनेक कसोट्यांवर घासून योग्य कामासाठी, योग्य व्यक्तीसाठी, समाजासाठी वापरले जातेच, पण त्यावर रोटरी क्लबचा, रोटरी प्रांताचा आणि आंतरराष्ट्रीय रोटरीचा प्रभाव असतो. काम करण्यासाठी काम करण्याची योग्य व्यवस्था असते.

मित्रांनो, आपले दातृत्व अनेक प्रकारे सिद्ध करता येते. ते करण्याचा प्रयत्न करा आणि तो रोटरीच्या माध्यमातूनच करा, म्हणजे ते सात्विक दान होईल.

The Rotary Foundation

# A Foundation to build on



# क्लब एडमिनिस्ट्रेशनः क्लब की जान

किसी भी क्लब की अच्छी परफॉर्मेंस के लिए उसका क्लब एडमिनिस्ट्रेशन अच्छा होना बहुत जरूरी है। इसके अंतर्गत जितनी भी कमेटियां हैं, वे सभी अपना-अपना कार्य ठीक ढंग से करें तो अध्यक्ष का आधा भार कम हो जाता है। रोटरी इनफॉर्मेशन अगर सदस्यों तक पहुंचेगी तो उनका रोटरी का ज्ञान बढ़ेगा और क्लब के कार्य (Projects) अच्छी तरह (well managed) किए जाएंगे। अच्छे प्रोजेक्ट देंगे तो पब्लिक इमेज बढ़ेगी, जिसकी वजह से सदस्य संख्या में बढ़ोतरी होगी। सदस्य संख्या बढ़ने से बड़े प्रोजेक्ट लेने के लिए संसाधन बढ़ेंगे और हेल्पिंग हैंड भी मिलेंगे। इसके साथ ही, सदस्य संख्या बढ़ने से नए-नए प्रोजेक्ट के लिए नए आइडियाज भी मिलेंगे।



**रो लितेश शाह**
**पूर्व अध्यक्ष**
**रोटरी क्लब ऑफ़ लातूर मिडटाउन**

१. फेलोशिप कमेटी - यह कमेटी सदस्यों में मित्रता बढ़ाने के लिए मीटिंग और प्रोजेक्ट्स में फैलोशिप का आयोजन करती है। अगर इसमें विविधता लाई जाए, तो सदस्य संख्या बढ़ाने में मदद हो सकती है।

२. रोटरी इनफॉर्मेशन कमेटी - साप्ताहिक मीटिंग में सदस्यों को रोचक रूप से रोटरी की जानकारी देना, नए-नए बनते नियमों के बारे में जानकारी देना, जिला और इंटरनेशनल इवेंट्स के बारे में बताना, इसी कमेटी का कार्य है। इसके लिए प्रश्नमंजूषा, भाषण, ग्रुप डिस्कशन, क्विज, डीबीटी प्रेजेंटेशन जैसे विविध साधनों का उपयोग किया जा सकता है।

३. प्रोग्राम कमेटी - साप्ताहिक मीटिंग में विभिन्न विषयों पर अच्छे वक्ता बुलाना, उनके भाषण या इंटरव्यू आयोजित करना इस कमेटी का कार्य है। एक मीटिंग रोटरी इनफॉर्मेशन के लिए भी रखी जा सकती है।

४. अटेंडेंस कमेटी - साप्ताहिक मीटिंग, प्रोग्राम और प्रोजेक्ट्स में अटेंडेंस बढ़ाने के लिए विविध प्रयास करना इस कमेटी का कार्य है। फेलोशिप और प्रोग्राम कमेटी के साथ मिलकर अटेंडेंस बढ़ाई जा सकती है। अच्छे फेलोशिप और प्रोग्राम होंगे, तो अटेंडेंस भी बढ़ेगी। अटेंडेंस संबंधित रिकॉर्ड रखना और जिला को रिपोर्ट भेजना भी इस कमेटी का काम है।

५. सार्जेंट एट आर्म्स कमेटी - मीटिंग और प्रोग्राम्स में अनुशासन बनाए रखना और आए हुए गेस्ट का सम्मान करना सार्जेंट का मुख्य कार्य है।

६. बुलेटिन कमेटी - क्लब की बुलेटिन प्रकाशित करना, जिसमें क्लब की गतिविधियां, जिला इवेंट्स, रोटरी इनफॉर्मेशन, बर्थडे मैसेज, मैरिज एनिवर्सरी और सदस्यों की विशेष उपलब्धियों की जानकारी हो, यह इस कमेटी का कार्य है।

७. क्लब इतिहास कमेटी - क्लब का इतिहास हर वर्ष का संरक्षित रखना इस कमेटी का कार्य है। इसमें प्रोग्राम्स, प्रोजेक्ट्स, विविध अवार्ड्स, फोटो आदि शामिल किए जाते हैं।

सभी कमेटियों के समन्वय से क्लब का प्रशासन प्रभावी और सफल बनता है।

# दांडिया रास कार्यक्रम 2024










रोटरी क्लब ऑफ लातूर मिड टाऊनचा दांडिया रास कार्यक्रम 2024 संपन्न

दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी, रोटरी क्लब ऑफ लातूर मिड टाऊनच्या दांडिया रास कार्यक्रमात क्लबच्या सदस्यांनी मनसोक्त आनंद लुटला! अतिथी लॉन, अंबाजोगाई रोड येथे संध्याकाळी 6 वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात सदस्यांनी उत्साहात सहभागी होऊन रंगतदार डांडिया खेळला.

कार्यक्रमातील मस्ती, नृत्य आणि आनंदाच्या क्षणांचा आनंद घेताना सर्वांनी एकत्र येण्याचा अनुभव खूपच खास होता. आपणा सर्वांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलेल्या सहकार्यासाठी मनापासून धन्यवाद!

कार्यक्रमाची व्यवस्था पाहणाऱ्या आमच्या प्रोजेक्ट चेअरमन रो. दीपक व प्रीती शाह, फेलोशिप चेअरमन रो. कलश मुंदडा यांचे विशेष कौतुक!

प्रोजेक्ट चेअरमन रो. दीपक व प्रीती शाह
फेलोशिप चेअरमन रो. कलश मुंदडा



# आरोग्य तपासणी शिबिर












रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व भारत विकास परिषद सिद्धेश्वर शाखेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर संपन्न!

दिनांक 16/10/2024 रोजी शासकीय महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे प्रथम वर्षातील 306 मुलींच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या अंतर्गत 306 मुलींची रक्त तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत करण्यात आले, ज्यामध्ये रो डॉ. मंगेश कुलकर्णी यांनी थैलीसीमिया या आजाराबद्दल महत्वपूर्ण व्याख्यान दिले. रक्त तपासणी शिबिर साधारणतः दुपारी 12 वाजता सुरू होऊन सायंकाळी 6 वाजता यशस्वीरीत्या पार पडले.

उद्घाटन सत्रात शासकीय महिला तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. बकवाड सर, सर्व विभाग प्रमुख व अधिकारी वर्ग तसेच रोटरी मिडटाऊनचे अध्यक्ष रो चेतन पंढरीकर, सचिव रो गिरीश पेन्सलवार , भारत विकास परिषद सिद्धेश्वर शाखेचे अध्यक्ष सीए जगदीश तोष्णीवाल, सचिव राजन अयाचित, सदस्य सर्वोत्तम कुलकर्णी, बालाजी बिरादार, अजय सूळ, प्रमुख व्याख्याते रो डॉ. मंगेश कुलकर्णी व कार्यक्रम प्रमुख विशाल अयाचित, किशोर दाताळ यांची उपस्थिती होती.

# प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण












स्वाधार अंध अपंग स्वयंरोजगार प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र बुधोडा ता. औसा जि. लातूर येथे पांढरी काठी दिन निमित्त काठी चे वाटप त्याचबरोबर ग्रामिण श्रमिक प्रतिष्ठान डिजिटल मीडिया कंटेट डेव्हलपमेंट प्रशिक्षण प्रमाणपत्र चे वितरण रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन चे अध्यक्ष रो. चेतन पंढरीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

त्या प्रसंगी रोटरी क्लब लातूर चे अध्यक्ष रो.श्रीमंत कावळे व रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन चे अध्यक्ष रो. महादेव पांडे ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष हरिशचंद्र सुडे प्रतिष्ठानचे कार्यकारी संचालक सतीश अशटुरे कार्यकारी विश्वस्त प्रशांत सुडे, प्रशिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# ढिवाळी पाककृती कार्यशाळा!







रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व इनरव्हील क्लब ऑफ लातूर, तसेच एल जी यांच्या सहकार्याने महिलांसाठी एक खास दिवाळी पाककृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही मोफत कार्यशाळा सुप्रसिद्ध शेफ शहनाझ शेख (संभाजीनगर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली, ज्यात त्यांनी नवीन व आरोग्यदायी पदार्थ तयार करण्याचे तंत्र आणि उपयोगी टिप्स शेअर केल्या.

कार्यशाळा भालचंद्र ब्लड बँक येथे पार पडली आणि स्थानिक महिलांचा मोठ्या उत्साहाने सहभाग होता. या कार्यशाळेमुळे महिलांना त्यांच्या पाककृती कौशल्यात आणखी नवा रंग भरता आला, तेही दिवाळीच्या सणासाठी अगदी योग्यवेळी!

सर्व सहभागी महिलांचे, शेफ शहनाझ शेख यांचे आणि आमच्या उत्तम संयोजकांचे मनःपूर्वक आभार! रो अमोल बनाळे यांच्या समन्वयासाठी, तसेच इनरव्हील क्लब ऑफ लातूर च्या अध्यक्ष सारिका गांधी आणि प्रकल्प अध्यक्षा रचना मालपानी यांचे विशेष आभार.

प्रोजेक्ट चेअरमन -
फेलोशिप चेअरमन -








# नवरात्र महोत्सव 2024





रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने नवरात्र महोत्सव 2024: श्री महालक्ष्मी महापूजा व आरती

दिनांक 07 ऑक्टोबर 2024 रोजी, श्री महालक्ष्मी मंदिर, गांधी चौक, लातूर येथे “नवरात्र महोत्सव 2024” निमित्त आयोजित महापूजा व आरती अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या सदस्यांनी या पवित्र प्रसंगी आपल्या शुभहस्ते महापूजा आणि आरती करून देवीचे आशीर्वाद प्राप्त केले.

श्री महालक्ष्मी मंदिर समिती चे मनःपूर्वक आभार.

सर्व सदस्यांनी आपल्या कुटुंबीयांसह उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने हा सोहळा अत्यंत भावपूर्ण व संस्मरणीय झाला.

धन्यवाद आणि देवी श्री महालक्ष्मी मातेचे आशीर्वाद सदैव आपल्यावर राहोत!


















एक व्यक्ती वार्षिक
पालकत्व
रक्कम फक्त
रू.१०,०००/-

रोटरी अन्नपूर्णा
आश्रयदाते योजना
६५,०००/-

दसऱ्यानिमित्त अन्नपूर्णा योजनेत सर्व पुरुष लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन ड्रेस भेट देण्यात आले. या उपक्रमासाठी आर्थिक मदत करणाऱ्या सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार! या कृतीने आनंद आणि सहकार्याचा एक उत्तम आदर्श निर्माण झाला आहे. सर्व आजोबांनी दसऱ्याच्या शुभेच्छा देत ईश्वराकडे अशीच सद्बुद्धी कायम राहो, अशी प्रार्थना केली आहे.





बँक खात्याचा तपशील :
रोटरी अन्नपूर्णा योजना, लातूर
बँक : जनता सहकारी बँक लि.पुणे
खाते क्रमांक : 013220100048209
IFSC Code : JSBP0000013
शाखा – चैनसुख रोड, लातूर

देशी केंद्र शाळेच्या 1986 च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या पवित्र सणानिमित्त अन्नपूर्णा योजनेतील लाभार्थी आजी-आजोबांना दिवाळीचा फराळ दिला. या उपक्रमातून त्यांनी सणाचा आनंद वृद्धांना दिला असून, एक उत्तम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले आहे.

Rotary

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन
२०२४ – २०२५
आयोजित



# बांधकाम ते गृहसजावट क्षेत्रातील व्यवसाय वृध्दीसाठी सुवर्णसंधी..!

बांधकाम क्षेत्रातील सर्व वस्तु व
सेवा पुरवठाधारकांचे

**Latur Build Expo 2025**

हे भव्य प्रदर्शन आयोजित करीत आहोत.

दुसरे
भव्य प्रदर्शन



पहिल्या प्रदर्शनाच्या भरघोस,
उत्तम प्रतिसादानंतर दुसरे भव्य प्रदर्शन

**Building Construction Materials, Contractors, Architects, Interior, Exterior & Much More**
Experience The Future

# Latur Build EXPO 2025

03 04 05 06 Jan

ठिकाण :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क (टाऊन हॉल), महानगरपालिका समोर, लातूर.

# "PROUD MIDTOWN PARIVAAR"

## CELEBRATIONS & ACHIEVEMENTS



***Rtn.Deepak Shaha***
*Excellent  sales Achievement 1st prize for  financial year 2023-24, Congratulations*

***Lubha Archana Sachin Malu***
*Got Gold 🥇 Medal Under 14 in Rifle Shooting at Divison level... She Got Selected for the State Level Championship. Gold Medal is the Greatest achievement at 6th Standard ... We are proud of you Lubha ...*





*Heartiest congratulations to **Rtn Dr. Vijaykumar Birajdar** on earning his MBA in Finance at the age of 65!*
*We are extremely proud of your incredible academic achievements, which include an MBA in Finance, PHD, 5 Post-Graduations, 6 Graduations, and 12 Diplomas.  You are a true inspiration to us all!*

***Congratulations, Atharva Ajay Dudile!***
*We are so proud of you for passing both groups of the Intermediate Exam of The Institute of Chartered Accountants of India.  Your hard work and dedication have truly paid off.  Wishing you continued success in your CA journey!*






***Rtn Sachin Malu***

*Heartiest congratulations to Suman Sanskar Prep School for being awarded the Best Pre-Primary School among 4,500 participants nationwide! A proud moment for Mrs. Archana Malu, Rtn Sachin Malu, and the entire team—kudos to your dedication and excellence!*

***Rtn Dr Dinesh Soni***

*Congratulations on launching your 16th book "The Echoes of Heritage"*






***Rtn Omprakashji Zurule***

*the renowned STEAM Education Center in Latur has been honored with the award for "Outstanding School by READ LATUR." Heartfelt congratulations to the Director of STEAM Education Center, Rtn Omprakashji Zurule, and all the teachers and staff for this well-deserved recognition!*






***PDRR Rtn Prasad Warad***

*Congratulations on successfully conducting the orientation programs in Solapur and Karad! Your efforts to strengthen Rotaractivity through impactful topics like "Build a Successful Club" and "Club Administration" are truly commendable.*






*Congratulations to **Rtn Dr. Sanjaykumar Shivpuje** for conducting the impactful session "Sanvad Hryudayrogi" at Ambajogai! Your dedication to raising awareness about heart diseases is truly commendable.*






*Congratulations to **Dr. Urvashi Nagure** and the Robin Hood Army for being honored by Rayat Pratishthan Maharashtra Rajya! Your dedication to serving society is truly inspiring.*

# Meetings October






**Meeting No 14**
**Date - 06 October 2024**





**Meeting No 16**
**Date - 19 October 2024**







**Meeting No 17**
**Date - 26 October 2024**






**BOD Meeting No 4 Date - 22 October 2024**
**Guest - PP Rtn. Litesh Shah**




# November Birthdays

| Member Name | Date of Birth |
|---|---|
| Rtn MANMATH KASHINATH PANCHAKSHARI | 4-Nov |
| Rtn DR. SHRINIWAS GANGADHAR BHANDE | 8-Nov |
| Rtn MAHESH SONAR | 12-Nov |
| Rtn DR SANJAY KASHINATH SHIVAPUJE | 16-Nov |
| Rtn SUBODH SOMANI | 16-Nov |
| Rtn DHIREN VIJAYSINGH TIWARI | 21-Nov |
| Rtn PRASAD WARAD | 22-Nov |
| Rtn DR INDRAJIT MANOHAR LAKADE | 25-Nov |
| Rtn AJAY BARURE | 28-Nov |
| Rtn PARVAT S. NAGURE | 30-Nov |




# November Anniversary

| Member Name | Date of Anniversary |
|---|---|
| Rtn Dr DINESH SONI | 19-Nov |
| Rtn JAY PRAKASH SHRI KISHAN SONI | 21-Nov |
| Rtn AMOL BABURAO DADGE | 23-Nov |
| Rtn RAJESH BHILAVE | 26-Nov |
| Rtn NILESH ITKAR | 28-Nov |





September - Birthday Celebration